जनसामान्यांच्या मनातील आरसा
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028
वरुड | सोमवार
१३.०७.२०२६
# वरुड दर्पण
संपादक - चंद्रकांत भा. भड
RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485
वर्ष: ०७ | अंक: २४ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२
अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
+91 7745067712

## थोडक्यात

### बँकॉकमधील पबला भीषण आग : २७ जणांचा होरपळून मृत्यू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**बँकॉक** - थायलंडची राजधानी बँकॉकमधील एका पबमध्ये सोमवारी (दि.१३) भीषण आग लागून २७ जणांचा होरपळून मृत्यू झाला, तर अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. काही क्षणांतच संपूर्ण पबमध्ये आगीने रौद्ररूप धारण केल्याने नागरिकांमध्ये एकच गोंधळ उडाला. घटनास्थळावरील धक्कादायक दृश्ये समोर आली असून, आगीचे नेमके कारण शोधण्यासाठी प्रशासनाने चौकशी सुरू केली आहे. क्षणात पसरल्या आगीच्या ज्वाळा उत्तर बँकॉकमधील 'ना लाडप्राओ' पबमध्ये मध्यरात्री आग लागली. काही क्षणांतच संपूर्ण पबमध्ये आगीने भीषण रूप धारण केले.

# जेजुरीत भिषण अपघात, ट्रकच्या धडकेत 3 वारकरी महिलांचा मृत्यू

## ४ गंभीर जखमी, ज्ञानोबा माऊलींच्या पालखीतील दुर्दैवी घटना

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**जेजुरी** - आषाढी एकादशीला पंढरीच्या विठुरायाच्या दर्शनासाठी राज्यभरातून पालख्या निघाल्या आहेत.

आषाढी वारीसाठी राज्यभरातून वारकरी चालत पंढरीच्या दिशेने जात असतात. या आषाढी वारीला गालबोट लावणारी एक घटना सोमवारी सकाळी घडली आहे. जेजुरीत वारकऱ्यांच्या भीषण अपघात झाल्याची माहिती समोर येत आहे. या दुर्दैवी घटनेत तीन महिला वारकऱ्यांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे.

तर १५ ते १६ वारकरी जखमी असल्याची माहिती आहे. ज्या ट्रकने वारकऱ्यांना उडवले तो ट्रक वारकऱ्यांचे सामान वाहून नेणारा होता. या अपघातानंतर घटनास्थळी मोठा गोंधळ निर्माण झाला होता.



प्राथमिक माहितीनुसार, जेजुरी परिसरातील भोंगळे मळा वारकऱ्यांच्या अपघात झाला. यावेळी एका ट्रकने वारकऱ्यांच्या टेम्पोला धडक दिल्याचे समजते. यामध्ये १५ ते १६ वारकरी जखमी झाले होते. हे वारकरी ज्ञानोबा माऊलींच्या पालखीसोबत जात असताना हा प्रकार घडला.

यापैकी तीन महिलांचा मृत्यू झाला असून आणखी काही वारकऱ्यांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. ज्ञानोबा माऊलींची पालखी काल जेजुरी मुक्कामी होती. सासवडचा मुक्काम संपल्यानंतर आज पालखी जेजुरीत येणार आहे.

आज सकाळी वारकऱ्यांनी जेजुरीच्या दिशेने चालायला सुरुवात केली होती. या रस्त्याला एका बाजूने वाहने सोडली जात आहेत. या वारकऱ्यांना तातडीने नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आहे. त्यांच्यावर उपचार सुरु असून तिघांची प्रकृती गंभीर होती. यापैकी तीन महिलांचा मृत्यू झाला आहे.

# लाडकी बहिण योजनेत १४ लाख पुरुषांची नावे घुसवली

## भाजप प्रवक्त्यांचा काँग्रेसवर आरोप, महिला संख्या कमी झाल्याने वाद

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - महाराष्ट्राच्या राजकारणात गेमचेंजर ठरलेल्या लाडकी बहीण योजनेवरुन राजकीय आरोप, वाद पहिल्यापासूनच सुरू आहेत. मात्र, विधानसभा निवडणुक काळात लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या सुमारे अडीच कोटी बहिणींपैकी तब्बल ९२ लाख लाडक्या बहिणींची नावे योजनेतून वगळण्यात आली आहेत. त्यावरुन, राजकीय वातावरण तापलं असून केवळ निवडणूक काळात महिलांना आमिष देऊन मतं मिळवण्याचा भाजपचा हा डाव होता, अशी टीका विरोधकांकडून होत आहे. कारण, निवडणुकांवेळी सरकारने लाडक्या बहिणींची पडताळणी न करता पैसे दिले. आता, पडताळणीचे कारण दिले



जात असल्याचंही विरोधकांनी म्हटलं आहे. मात्र, काँग्रेससह विरोधकांच्या टीकेला भाजपने प्रत्युत्तर दिलंय.

सरकारने केवळ एक महिन्यापूर्वी लाडकी बहीण योजनेतून ८० लाख लाभार्थी कमी झाल्याचे सांगितले होते, मात्र आता हा आकडा थेट ९२ लाखांवर पोहोचला आहे. मूळ २.४ कोटी लाभार्थ्यांच्या तुलनेत ही घट तब्बल ३८ टक्के एवढी मोठी आहे. त्यावरुन, आता सत्ताधारी-विरोधक आमने-सामने आले आहेत. लाडकी बहीण योजनेवरून काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी भाजपवर टीका केल्यानंतर आता भाजपकडून देखील या टीकेला उत्तर देण्यात आले आहे. लाडकी बहीण योजनेत १४ लाखांच्या आसपास पुरुषांची नावे असून काँग्रेससह इतर पक्षांनीच ही नावे घुसवल्याचा आरोप भाजपा प्रवक्त राम कुलकर्णी यांनी केला. महायुती सरकारने लाडकी बहीण योजना आणल्यापासून तुमचे पोट दुखत असून विरोध करण्यासाठी तुम्ही न्यायाल्यात सुद्धा गेला होता, असेही कुलकर्णी यांनी म्हटले.

वर्षानुवर्षे तुम्ही सत्तेत राहिलात पण गरजू माता भगिनींना कधी फुटकी कवडी दिली नाही, याउलट आम्ही दिले तर विरोध करता. सरकार ही योजना कधीच बंद करणार नाही वडट्टीवारांनी राजकारणासाठी संभ्रम निर्माण करू नये, असे म्हणत काँग्रेसच्या आरोपावर भाजपने पलटवार केला.

**विविध कारणांसह नावे वगळली**

दरम्यान, केवळ तांत्रिक अडचणींमुळे नव्हे, तर ई-केवायसी न करणे, उत्पन्नाची मर्यादा ओलांडणे आणि वयाचे निकष न बसणे यांसारख्या विविध कारणांमुळे ही मोठी कपात करण्यात आली आहे. याशिवाय सुमारे १४ हजार पुरुषांनी या योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न केला होता, त्यामुळे त्यांनाही या योजनेतून वगळण्यात आले आहे.

## आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांच्या पुढाकाराने

# वरुड तालुक्यातील शेतकऱ्यांकरिता ६४ कोटी मंजूर

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** - आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांच्या अथक प्रयत्नातुन व सततच्या पाठपुराव्यामुळे १० जुलै रोजी प्रसिद्ध झालेल्या शासन मान्यता पत्रात वरुड तालुक्यातील शेतकऱ्यांकरिता ६४ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून लवकरच शेतकऱ्यांच्या बॅंकखात्यात तो वळता करण्यात येणार आहे. महत्वाची बाब म्हणजे संपूर्ण महाराष्ट्राकरिता शासनाने ८४ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून यामध्ये वरुड तालुक्याला ६४ कोटीचा लाभ होणार आहे.

प्राप्त माहितीनुसार, शासकीय अहवालात वरुड तालुक्यातील गारपीट व वादळीवाऱ्यासह नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई पासून वगळण्यात आल्याच्या शेतकऱ्यांच्या दिशाभुल करणाऱ्या बातम्या पसरविण्यात आल्या होत्या. परंतु वरुड तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी शासनाने भरीव



निधी उपलब्ध करुन दिल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. ३० व ३१ मे २०२६ रोजी वरुड तालुक्यात वादळीवारा व गारपीटीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले होते. या नुकसान भरपाईबाबत सरसकट पंचनामे करण्याचे आदेश आ. यावलकर यांनी प्रशासनाला दिले होते. नुकसान भरपाईबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे सुद्धा मागणी करण्यात आली होती. शासनाने ती मागणी मान्य केली. त्याबाबत १० जुलै रोजी शासन आदेश प्रारीत करण्यात आला आहे. यामध्ये जिल्ह्यातील ३०७७.४६ क्षेत्रफळातील २८,३८५ बाधीत शेतकऱ्यांकरिता ६७ कोटी ५८ लक्ष रूपायांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. यामध्ये वरुड तालुक्यातील २९,७७० हेक्टर क्षेत्रावरील १४२ गावातील २४,७७३ बाधीत शेतकऱ्यांचा समावेश आहे. त्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व आ.उमेश यावलकर यांचे आभार मानले आहेत. १५ जुन रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाला अहवाल सादर आ.यावलकर यांच्या आदेशानुसार १४२ गावातील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पंचनामे करण्यात आले. तो संयुक्त अहवाल १५ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात आला. या अहवालात वरुड तालुक्यातील २९,७७० हेक्टर क्षेत्रफळातील २४,७७३ शेतकऱ्यांचे फळबागांचे नुकसान झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. यासाठी सुमारे ६४ कोटी मदतीची आवश्यकता असल्याचे नमूद करण्यात आले होते.

# ट्रेलरच्या धडकेत भाऊ-बहिणीचा मृत्यू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - पनवेल-जेएनपीटी मार्गावर भरधाव ट्रेलरने दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने सख्ख्या भाऊ-बहिणीचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी सकाळी घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून पनवेल शहर पोलिसांनी ट्रेलरचालकाला ताब्यात घेतले आहे. या अपघातात प्रांशु भारद्वाज सिंग (१८) आणि त्याची बहीण वंशिका भारद्वाज सिंग (२०) यांचा मृत्यू झाला.




ते दुचाकीवरून पनवेल-जेएनपीटी मार्गाने जेएनपीटीच्या दिशेने जात असताना मागून येणाऱ्या टाटा कंपनीच्या ट्रेलरने त्यांच्या दुचाकीला डाव्या बाजूने जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, दोघेही रस्त्यावर फेकले गेले आणि गंभीर दुखापतीमुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. प्राथमिक तपासात ट्रेलरचालक राजीवकुमार विजयशंकर याने वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवल्याचे निष्पन्न झाले.

## तिवसाघाट ते वरुड रस्त्यावरील अपघातात जखमी

# सुरेश खंडेलवाल यांचे निधन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** - तिवसाघाट ते वरुड रोडवर माहरुक बना जवळ एक्टिवा व स्प्लेंडर मोटरसायकल मध्ये समोरा समोर झालेल्या धडकेत दोन्ही चालक गंभीर जखमी झाल्याची घटना चार दिवसा आगोदर सकाळी ११ वाजता घडली होती.

घटनेतील एक्टिवा चालक सुरेश खंडेलवाल यांचे निधन झाले. तिवसाघाट ते वरुड रोडवरील महारुग बना जवळ ७ जुलैला सकाळी



११ वाजताच्या दरम्यान मोटर सायकल क्रमांक एम एच ३१ सी यु ५६२१ व एक्टिवा एम एस २७ बी आर ६७६१ या दोन दुचाकीच्या समोरासमोर झालेल्या अपघातामध्ये स्प्लेंडर मोटरसायकल चालक राजेश प्रदीप युवनाते वय २२ वर्ष रा.वरुड हे गंभीर जखमी झाले असता त्यांना पुढील उपचाराकरिता अमरावती येथे रेफर करण्यात आले होते तर दुसरे एक्टिवा चालक सुरेश खंडेलवाल रा.शेंदुरजनाघाट (६७) वर्ष हे सुद्धा जखमी झाले होते व वरुड येथे खाजगी रुग्णालयात उपचार घेत असता त्याचे ११ जुलैला रात्री १०.३० वाजताच्या दरम्यान निधन झाले असुन त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात शेंदुरजनाघाट येथील सातनुर रोड वरील मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले असून त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, मुली, ३ भाऊ, बहीण, सुना, जावाई, नातवंड असा बराच मोठा आप्तपरिवार आहे.



# ‘जव्हार’ ठरला १०० टक्के तंबाखूमुक्त शाळांचा पहिला तालुका

## सर्व २६८ शाळांना तंबाखूमुक्त प्रमाणपत्र : व्यसनमुक्त समाजाकडे ऐतिहासिक पाऊल

(प्रतिनिधी वरूड दर्पण)




**जव्हार** – आरोग्यदायी आणि व्यसनमुक्त समाज घडविण्याच्या दिशेने जव्हार तालुक्याने महाराष्ट्रात ऐतिहासिक कामगिरी नोंदवली आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये तालुक्यातील सर्व २६८ शाळांनी तंबाखूमुक्त शाळेचे प्रमाणपत्र मिळवत राज्यातील १०० टक्के तंबाखूमुक्त शाळा असलेला पहिला तालुका होण्याचा मान मिळिवला आहे, अशी माहिती शिक्षक मधुकर भोये यांनी दिली.

सलाम मुंबई फाऊंडेशन आणि जिल्हा परिषद पालघर यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या या अभियानाला जव्हारसारख्या दुर्गम व आदिवासी भागातील शाळांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शासनाने तंबाखूमुक्त शाळांसाठी निश्चित केलेले सर्व निकष पूर्ण करून तालुक्यातील प्रत्येक शाळेने अधिकृत प्रमाणपत्र प्राप्त केले.

अभियान यशस्वी करण्यासाठी विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक, पालक आणि शिक्षण विभागाने एकत्रितपणे विविध जनजागृती उपक्रम राबविले.

तंबाखूविरोधी रॅली, रांगोळी स्पर्धा, लोकनाट्य, प्रबोधनपर व्याख्याने, विद्यार्थी-पालक संवाद तसेच कार्यशाळांच्या माध्यमातून तंबाखूच्या दुष्परिणामांविषयी प्रभावी जनजागृती करण्यात आली. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये तंबाखूविरोधी सकारात्मक दृष्टिकोन विकसित झाला.

---

# शिक्षिका योगिता खंडारे यांचे निधन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – तालुक्यातील रवाळा जि.प.प्राथमिक शाळा येथील आदर्श शिक्षिका योगिता सुरेश खंडारे यांचे अल्पशा आजाराने आज पहाटेच्या सुमारास निधन झाले.



शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत त्यांनी मोलाचे योगदान दिले. आपल्या प्रेमळ स्वभावामुळे त्या विद्यार्थी, पालक, सहकारी शिक्षक आणि समाजातील सर्व घटकांमध्ये लोकप्रिय होत्या. त्यांच्या अकाली जाण्याने शैक्षणिक तसेच सामाजिक क्षेत्राची मोठी हानी झाली असल्याची भावना व्यक्त होत आहे. योगिता खंडारे यांच्या निधनाबद्दल विविध स्तरांतून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या पार्थिवावर केदारेश्वर मोक्षधाम येथे स्वकीय, आप्तेष्ट, नातेवाईक व शहरवासीयांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्या रवाळा जि.प.प्राथमिक शाळा येथे सहायक शिक्षक सुरेश खंडारे यांच्या धर्मपत्नी होत्या त्यांच्या मागे पती, २ मुले असा आप्तपरिवार आहे.

---

# कंत्राटदाराची मुजोरी! साकीनाका मॅनहोलप्रकरणी पालिकेच्या कारणे दाखवा नोटिशीला केराची टोपली

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – साकीनाका येथे उघड्या मॅनहोलमध्ये पडून अस्लम शेख यांचा मृत्यू झाला.

या प्रकरणात सहाय्यक आयुक्तांसह तिघा अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे, तर या प्रकरणात कंत्राटदार दोषी आहे का, कंत्राटदारांचे काय म्हणणे हे जाणून घेण्यासाठी सात दिवसांपूर्वी कारणे दाखवा नोटीस बजावली. मात्र सात उलटले तरी कंत्राटदाराने पालिकेच्या नोटिसीला केराची टोपली दाखवत उत्तर देणे टाळले आहे. कंत्राटदाराचे उत्तर येत नसल्याने त्यला काळ्या यादीत टाकण्याची प्रक्रिया रखडली आहे. ३० जून ते ६ जूनपर्यंत मुंबईत मुसळधार पाऊस बरसला.? आठ दिवस बरसणाऱ्या पावसामुळे मुंबईत झाड व झाडांच्या फांद्या कोसळणे अशा दुर्घटना घडल्या. कुर्ला पश्चिम येथे मुंबई महापालिकेचे एल वॉर्ड कार्यालय आहे. एल विभाग कार्यालया अंतर्गत साकीनाका खैराणी रोड येतो.

---

# सिंड्रोमिक मुलाला मिळाली आयुर्वेदाची ‘संजीवनी’

## डॉ.चरण सोनारे यांच्या प्रयत्नांना यश, शिरोधरामुळे सर्वांगीण विकासात मोठा बदल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**वरुड** – डाउन सिंड्रोमसारख्या जटिल स्थितीतही आयुर्वेद आणि पंचकर्म उपचारपद्धती आशेचा किरण ठरु शकते, हे डॉ.चरण सोनारे यांच्या उपचारांमुळे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

एका ूपवीाळल मुलाच्या सर्वांगीण विकासात आलेला सकारात्मक बदल पाहून पालकांनाही नवे बळ मिळाले आहे. डाउन सिंड्रोमुळे त्या मुलाच्या शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक विकासात सुरुवातीपासूनच अडथळे येत होते.

मुलाची एकाग्रता कमी होती, स्नायूंची ताकद आणि बोलण्यातही अडचण होती. त्यामुळे पालक अत्यंत चिंताग्रस्त होते. ॲलोपॅथी उपचाराबरोबरच मुलाच्या विकासासाठी काहीतिरिक्त पर्याय शोधत असताना त्यांची भेट डॉ.चरण सोनारे यांच्याशी झाली.

डॉ.सोनारे यांनी मुलाची प्रकृती, दोष आणि लक्षणे तपासून आयुर्वेद पंचकर्मातील शिरोधरा ही चिकित्सा सुरु केली.

शिरोधरा ही तणाव कमी करणारी, मज्जासंस्था शांत करणारी आणि मेंदूच्या कार्याला चालना देणारी प्रक्रिया आहे. यामध्ये औषधी तेल कपाळावर विशिष्ट पद्धतीने धारास्वरुपात टाकले जाते. त्यामुळे झोप सुधारते, चिडचिड कमी होते आणि एकाग्रता वाढते. सलग काही महिने शिरोधरा आणि इतर सहाय्यक आयुर्वेदिक औषधोपचार घेतल्यानंतर मुलामध्ये प्रकर्षाने बदल दिसू लागला.

त्याच्या शारीरिक हालचालींमध्ये सुधारणा झाली, बोलण्यात स्पष्टता आली, डोळ्यातील संपर्क आणि सामाजिक प्रतिसाद वाढला. तसेच शिकण्याची गती आणि स्मरणशक्तीतही फरक जाणवला. डॉ.चरण सोनारे म्हणाले, ‘डाउन सिंड्रोम पूर्णपणे बरा होऊ शकत नाही, परंतु आयुर्वेदाच्या साहाय्याने मुलाचा जास्तीत जास्त विकास साधता येतो.

शिरोधरा मेंदूतील पेशींना पोषण देते आणि शरीर-मनाचा समतोल राखते. वेळेवर सुरु केलेल्या उपचारांमुळे चांगले परिणाम मिळतात.

या यशस्वी उपचारामुळे पालकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. त्यांचे म्हणणे आहे की, आम्हाला वाटले होते विकास खूप मर्यादित राहील, पण आयुर्वेदामुळे आमच्या मुलात आम्हाला खरा बदल दिसला आहे. डॉ.सोनारे यांच्या या कार्यामुळे मुलांच्या पालकांमध्ये आयुर्वेदाबद्दल नवीन विश्वास निर्माण झाला आहे.

वेळेवर आणि योग्य मार्गदर्शनाखाली घेतले उपचार हे खऱ्या अर्थाने ‘संजीवनी’ ठरु शकतात, हेच या घटनेतून दिसून येते. विद्यार्थ्याच्या बौद्धिक व शारीरिक विकासा मध्ये प्रकर्षाने प्रगती जाणवली. डॉ.सोनारे यांच्या उपचाराने विद्यार्थ्याची शैक्षणिक गुणवत्ता सुधारत आहे.

---

# सोनम वांगचूक शरीराने कोसळले, सरकारला बळी हवाय, त्यांना लढणारे लोक नको आहेत, तुरुंगात टाकता येत नसल्याने असं मारू इच्छित : संजय राऊतांचा सडकून प्रहार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – सोनम वांगचूक यांच्या उपोषणाला आज १४-१५ दिवस झाले असून शरीराने कोसळून पडले आहेत, तरुणांनी रस्त्यावर यावं, सरकारला सोनम वांगचूक यांचा बळी हवाय. त्यांना लढणारे लोक नको आहेत. ज्यांना तुरुंगात टाकता येत नाही, त्यांना ते अशा प्रकारे मारू इच्छित आहेत. या सरकारची नियत हीच असल्याचा घणाघाती प्रहार शिवसेना खासदार संजय राऊत यांनी केला. नीट पेपर घोटाळ्यात केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी उपोषणासाठी चालले आहेत. मात्र, मोदी सरकारकडून कोणत्याही प्रकारची आतापर्यंत हालचाल करण्यात आलेली नाही. २० जूनपासून कॉकरोच जनता पार्टीने आंदोलन सुरु केलं असून अभिजित दीपके सुद्धा आंदोलनात आहेत.

हे सरकार काय करतं? राऊत यांनी सांगितले की, अण्णा हजारे जेव्हा उपोषणाला बसले होते तेव्हा मनमोहन सिंग प्रधानमंत्री होते, असा एकही दिवस गेला नाही मनमोहन सिंग सरकारचा की मोठ्या नेत्याच्या नेतृत्वाखाली डेलिगेशन जाऊन अण्णांना भेटलं नाही. हे सरकार काय करतं? सोनम वांगचूक हा साधा माणूस नसल्याचे ते म्हणाले. संजय राऊत यांनी लाडकी बहिण योजनेवरून हल्लाबोल केला.

---

# शरद पवार-शिंदेंच्या भेटीमुळे संशयाचे धुके

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**नागपूर** – राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू असताना, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्यात झालेली अचानक भेट सध्या राजकीय वतुर्ळात प्रचंड चर्चेचा विषय ठरत आहे. अत्यंत महत्त्वाची बाब म्हणजे, चालू असलेली मंत्रिमंडळाची बैठक अर्ध्यावर सोडून एकनाथ शिंदे हे शरद पवार यांच्या भेटीला पोहोचले होते. या दोन्ही नेत्यांमध्ये महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाल्याची माहिती समोर आल्यानंतर आता अजित पवारांच्या पक्षातील आमदार अनिल पाटील यांनी मोठी प्रतिक्रिया दिलीय.

‘महाविकास आघाडीमध्ये बिघाडी झाली म्हणून किंवा त्यांना एनडीएला समर्थन द्यायचे असेल म्हणून शरद पवार हे एकनाथ शिंदे यांच्याकडे भेटीसाठी गेल्याची शंका आहे,‘ असा थेट संशय राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार अनिल पाटील यांनी बोलून दाखवला आहे. अनिल पाटील म्हणाले की, ही भेट अचानक झाली, मात्र शेवटी शरद पवार साहेब हे एकनाथ शिंदे यांच्याकडे का गेले, याबद्दल राजकीय वतुर्ळात अनेक शंका उपस्थित केल्या जात आहेत. पवार साहेब त्यांच्याकडे का गेले? महाविकास आघाडीमध्ये बिघाडी झाली आहे म्हणून पवार साहेब गेले का? की त्यांना एनडीएला समर्थन द्यायचे आहे? अशा अनेक शंका आहेत. ’इंडिया’ आघाडीमधून बाहेर पडून एनडीएमध्ये येण्यासाठी शरद पवार साहेबांना केंद्रीय नेतृत्व आणि केंद्रीय पक्ष यांच्यासोबत चर्चा करावी लागेल.

पूर्वी २०१४ मध्ये एनडीएमध्ये जाण्यासाठी जेव्हा समर्थन दिले होते, त्यावेळी काय झाले? तसेच २०१७ मध्ये एनडीएमध्ये जाण्यासाठी शरद पवार साहेबांनी जी चर्चा केली होती, त्यावेळी नक्की काय झाले? या सर्व पार्श्वभूमीचा आणि इतिहासाच्या संदर्भात आज एनडीए मधील सर्व घटक पक्ष विचार करत असतील.

---

## जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा सुरळी येथिल

# आदर्श शिक्षक चंद्रशेखर देशमुख यांचा निरोप समारंभ

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा सुरळी येथून बदली झालेल्या आदर्श शिक्षक तथा मुख्याध्यापक चंद्रशेखर देशमुख यांचा भावपूर्ण सत्कार व निरोप समारंभ नुकताच शाळेत उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष नितीन नथिले तर प्रमुख अतिथी म्हणुन पंचायत समिती शिक्षण विस्तार अधिकारी सुनील राठोड उपस्थित होते. यावेळी उपाध्यक्ष जीवन टेकोडे, पोलीस पाटील पुष्पा बहुरुपी, महात्मा गांधी तंटामुक्ती समिती अध्यक्ष निलेश कोहळे, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. यानंतर शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन देशमुख यांचा सत्कार करण्यात आला.

शाळा, विद्यार्थी तसेच इयत्ता ५ व ७ विद्यार्थ्यांनीही त्यांना भेटवस्तू देऊन कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी मनोगतातून देशमुख सरांविषयीच्या भावना व्यक्त करत त्यांच्या कार्याचा गौरव केला. चंद्रशेखर देशमुख हे जि.प.शाळा सुरळी येथे कार्यरत असतांना त्यांनी विवध उपक्रम राबवुन शाळेला विविध पुरस्कार पटकावुन दिले.

शिक्षण विस्तार अधिकारी सुनील राठोड यांनी देशमुख सरांच्या बदलीबद्दल खंत व्यक्त करत त्यांच्या कार्याचे कौतुक केले. विविध मान्यवरांनी देशमुख सरांचे नेतृत्व, कार्यतत्परता, विद्यार्थ्यांवरील प्रेम, सहकाऱ्यांना दिलेले सहकार्य आणि शाळेविषयीची आत्मीयता यांचा गौरव केला. सत्काराला उत्तर देताना कोणतेही काम एकट्याने होत नाही; सर्व सहकाऱ्यांच्या सहकार्यामुळेच ही यशस्वी वाटचाल शक्य झाली, असे देशमुख सरांनी नम्रपणे सांगितले. यावेळी त्यांनी शाळेसाठी ५ हजार रुपयांची देणगी जाहीर केली तसेच सर्व विद्यार्थ्यांना गुलाबजामूनचे वाटप करुन आपल्या प्रेमाची आठवण कायम ठेवली.

भावनिक वातावरणात झालेल्या या कार्यक्रमाची सांगता आभार प्रदर्शनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक वानखडे यांनी केले तर संचालन ज्योती गाडगे यांनी केले.

# संपादकीय

**प्रयत्न केल्याशिवाय यश मिळत नाही,
प्रयत्न करणारा कधीच अपयशी ठरत नाही.**

## सत्ताधारी व विरोधक दोघेही दिशाहीन : लोकशाहीसमोरील मोठे आव्हान

महाराष्ट्राचे राजकारण गेल्या काही वर्षांत अभूतपूर्व घडामोडींमधून जात आहे. पक्षफुटी, आघाड्या, युती, सत्तांतर, पक्षांतर आणि न्यायालयीन लढाया या घटनांनी राज्याच्या राजकीय संस्कृतीवर मोठा परिणाम झाला आहे. आज परिस्थिती अशी आहे की, सत्ताधारी पक्षांवर जनादेशाचा अपमान केल्याचा आरोप होत आहे, तर विरोधी पक्ष आपली भूमिका प्रभावीपणे मांडण्यात अपयशी ठरत असल्याचे चित्र दिसते. परिणामी, राज्यात सक्षम सत्ताधारी आणि जबाबदार विरोधक या लोकशाहीच्या दोन महत्त्वाच्या स्तंभांपैकी दोन्ही कमकुवत होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. लोकशाहीमध्ये जनतेने दिलेला कौल हा सर्वोच्च मानला जातो. मतदारांनी विशिष्ट विचार, धोरणे आणि नेतृत्वावर विश्वास ठेवून मत दिलेले असते. मात्र, निवडणुकांनंतर राजकीय समीकरणे बदलणे, पक्षांतर करणे किंवा अनपेक्षित युती करणे यामुळे जनतेच्या विश्वासाला तडा जातो. महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांत अशा अनेक घटना घडल्या. त्यामुळे मतदारांच्या मनात राजकारणाविषयी संभ्रम आणि नाराजी वाढली आहे.

लोकशाहीचा पाया मजबूत राहण्यासाठी जनादेशाचा आदर करणे आवश्यक असते. सध्याचे सत्ताधारी सरकार विकासकामे, पायाभूत सुविधा, गुंतवणूक आणि विविध योजनांचा वेग वाढविण्याचा दावा करत असले, तरी अनेक महत्त्वाच्या प्रश्नांवर त्यांना सातत्याने टीकेला सामोरे जावे लागत आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न, बेरोजगारी, वाढती महागाई, शिक्षण, आरोग्य व्यवस्था, महिला सुरक्षेसारखे विषय अजूनही नागरिकांसाठी चिंतेचे आहेत. केवळ मोठ्या प्रकल्पांच्या घोषणा करून जनतेच्या दैनंदिन अडचणी दूर होत नाहीत. शासनाची खरी परीक्षा नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांवर प्रभावी उपाययोजना करण्यात असते. दुसरीकडे विरोधी पक्षांची परिस्थितीही फारशी समाधानकारक नाही. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) या प्रमुख विरोधी पक्षांमध्ये संघटनात्मक आव्हाने, नेतृत्वाचे प्रश्न आणि अंतर्गत मतभेद यांची चर्चा सातत्याने होत आहे. सरकारवर प्रभावीपणे अंकुश ठेवण्याची जबाबदारी विरोधकांची असते. विधानसभेत आणि जनतेमध्ये सरकारच्या धोरणांवर तथ्याधारित टीका करून पर्यायी विचार मांडणे हे विरोधकांचे कर्तव्य असते. मात्र, अनेकदा विरोधकांचे लक्ष अंतर्गत राजकारणातच अधिक गुंतल्याचे दिसून येते. लोकशाहीत सक्षम विरोधक नसतील तर सरकारवर प्रभावी नियंत्रण राहात नाही. सत्ताधारी पक्षांच्या निर्णयांचे परीक्षण करणारा, चुकीच्या धोरणांवर प्रश्न उपस्थित करणारा आणि जनतेच्या समस्या सातत्याने मांडणारा विरोधी पक्ष लोकशाहीसाठी अत्यावश्यक असतो. विरोधक कमकुवत झाल्यास सत्ताधाऱ्यांवर उत्तरदायित्वाचा दबाव कमी होतो. त्यामुळे लोकशाहीतील समतोल बिघडण्याचा धोका निर्माण होतो. राजकारणातील वारंवार होणाऱ्या पक्षांतरांमुळे कार्यकर्त्यांमध्येही संभ्रम निर्माण झाला आहे. वर्षानुवर्षे एका विचारधारेसाठी काम करणारे कार्यकर्ते अचानक बदललेल्या राजकीय समीकरणांमुळे अस्वस्थ होतात. याचा परिणाम पक्षसंघटनांवर आणि मतदारांच्या विश्वासावर होतो. मतदारांना पक्षांपेक्षा व्यक्तिकेंद्री राजकारण अधिक दिसू लागल्याने विचारधारेला दुय्यम स्थान मिळत आहे. राज्यातील अनेक महत्त्वाचे प्रश्न आजही प्रलंबित आहेत. शेती आणि सिंचन, औद्योगिक विकास, रोजगारनिर्मिती, ग्रामीण रस्ते, आरोग्य सुविधा, शिक्षणाची गुणवत्ता, शहरांतील पायाभूत सुविधा आणि पर्यावरण संरक्षण या विषयांवर सातत्यपूर्ण आणि दीर्घकालीन धोरणांची गरज आहे. दुर्दैवाने अनेकदा राजकीय संघर्ष या मूलभूत प्रश्नांवर मात करतो. आरोप-प्रत्यारोपांच्या राजकारणात जनतेचे प्रश्न मागे पडतात. राजकीय पक्षांनी केवळ निवडणुकांपुरते सक्रिय न राहता वर्षभर जनतेशी संवाद ठेवणे आवश्यक आहे.

# महिला सक्षमीकरणाचा मानबिंदू





भारतीय सशस्त्र दलात महिलांचे वाढते योगदान हे देशाच्या बदलत्या सामाजिक आणि व्यावसायिक दृष्टिकोनाचे प्रतीक आहे. महिलांनी केवळ सैन्यात प्रवेश मिळवला नाही, तर आपल्या गुणवत्ता, नेतृत्व, शिस्त आणि कर्तृत्वाच्या बळावर सर्वोच्च जबाबदाऱ्याही यशस्वीपणे पेलण्याची क्षमता सिद्ध केली. अशाच प्रेरणादायी प्रवासाची साक्ष देणारी मेजर नव्या शेखावत यांची भारताच्या राष्ट्रपतींच्या सहाय्यक अधिकारी (एडीसी ) म्हणून झालेली नियुक्ती ही महिला सक्षमीकरणाच्या नव्या पर्वाचा अभिमानास्पद टप्पा ठरली आहे.

जर नव्या शेखावत यांनी भारतीय लष्कराच्या इतिहासात नवा अध्याय लिहिला. त्या भारताच्या राष्ट्रपतींच्या सहाय्यक अधिकारी (एडीसी) म्हणून नियुक्त झालेल्या भारतीय सैन्याच्या पहिल्या महिला अधिकारी ठरल्या आहेत. राष्ट्रपती भवनातील ही प्रतिष्ठेची नियुक्ती भारतीय सशस्त्र दलासाठी एक ऐतिहासिक टप्पा असून, जबाबदारी, सन्मान आणि राष्ट्रीय प्रोटोकॉलच्या महत्त्वाच्या पदांवर महिलांची वाढती भूमिका अधोरेखित करणारे गौरवास्पद उदाहरण आहे.

सैन्य सेवा दला(आर्मी सर्व्हिस कॉर्प)मधील अधिकारी असलेल्या मेजर नव्या शेखावत या सध्या भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या सहाय्यक अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. भारतीय सैन्यातील या पदावर नियुक्त होणाऱ्या त्या पहिल्या महिला अधिकारी असल्या तरी यापूर्वी मे २०२५ मध्ये भारतीय नौदलाच्या लेफ्टनंट कमांडर यशस्वी सोलंकी या राष्ट्रपतींच्या पहिल्या महिला अधिकारी बनल्या होत्या. मेजर शेखावत यांचे यश केवळ वैयक्तिक कामगिरी नसून भारतीय सशस्त्र दलांमध्ये महिलांच्या वाढत्या योगदानाचे आणि नेतृत्वक्षमतेचे प्रतीक आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे गुणवत्ता, व्यावसायिकता आणि नेतृत्व या गुणांच्या आधारे महिलांना सर्वोच्च जबाबदाऱ्या दिल्या जात असल्याचे स्पष्ट होते. मेजर शेखावत यांचा भारतीय सैन्यातील प्रवास संघ लोकसेवा आयोग (यूपीएससी) आयोजित संयुक्त संरक्षण सेवा (कम्बाइन्ड डिफेन्स सर्व्हिसेस-सीडीएस) परीक्षेद्वारे सुरू झाला. त्यांनी ही अत्यंत स्पर्धात्मक अशी परीक्षा उत्तीर्ण करून अधिकारी प्रशिक्षण अकादमी (ऑफिसर्स ट्रेनिंग ॲकॅडमी), चेन्नई येथील शॉर्ट सर्व्हिस कमिशन महिला अ-तांत्रिक (वुमन नॉन टेक्निकल) अभ्यासक्रमासाठी गुणवत्ता यादीत स्थान मिळवले. अधिकारी प्रशिक्षण अकादमी चेन्नई ही भारतीय सैन्याची एक प्रतिष्ठित प्रशिक्षण संस्था आहे. येथे शारीरिक क्षमता, मानसिक खंबीरपणा, नेतृत्वगुण, शिस्त आणि अधिकारी म्हणून आवश्यक असलेले सर्व गुण विकसित केले जातात. मेजर शेखावत यांनी हे कठोर प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करून भारतीय सैन्यात अधिकारी म्हणून नियुक्ती मिळवली.

त्यांना सेना सेवा दल (आर्मी सर्व्हिर्स कॉर्प)मध्ये नियुक्त करण्यात आले.

भारतीय सैन्याच्या दृष्टीने ही अत्यंत महत्त्वाची शाखा असून, लष्करासाठी आवश्यक असलेला रसद पुरवठा, वाहतूक व्यवस्था, इंधन, अन्नधान्य आणि इतर जीवनावश्यक सामग्रीचे व्यवस्थापन ही तिची मुख्य जबाबदारी आहे. कोणत्याही लष्करी मोहिमेच्या यशामध्ये प्रभावी रसद व्यवस्था अत्यंत महत्त्वाची असते आणि त्यामध्ये सैन्य सेवा दलाची भूमिका कणा म्हणून ओळखली जाते. सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड (सीडीएस) परीक्षेत यश मिळवणाऱ्या एका उमेदवारापासून ते भारतीय सैन्यात अधिकारी आणि त्यानंतर राष्ट्रपतींच्या सहाय्यक अधिकारीसारख्या प्रतिष्ठित पदापर्यंत पोहोचलेला त्यांचा प्रवास त्यांच्या समर्पण, कौशल्य आणि व्यावसायिक उत्कृष्टतेचे उदाहरण आहे. सेवेत तुलनेने कमी कालावधीत त्यांची या पदासाठी झालेली निवड ही त्यांच्या क्षमतेवर सैन्याने दाखवलेल्या विश्वासाची साक्ष आहे.

राष्ट्रपतीची सहाय्यक अधिकारी हे पद भारतीय सशस्त्र दलांतील अत्यंत प्रतिष्ठेचे आणि मानाचे मानले जाते. सहाय्यक अधिकारी हे राष्ट्रपतींच्या वैयक्तिक कर्मचारीवर्गाचा भाग असतात आणि अधिकृत कार्यक्रम, राष्ट्रीय समारंभ, पदक वितरण सोहळे, राजनैतिक कार्यक्रम तसेच विविध शासकीय समारंभांमध्ये राष्ट्रपतींना सहाय्य करतात.

या पदासाठी शिस्त, आत्मविश्वास, प्रभावी व्यक्तिमत्त्व, उत्तम संवादकौशल्य आणि लष्करी प्रोटोकॉलचे सखोल ज्ञान आवश्यक असते. सहाय्यक अधिकारी हे केवळ आपल्या दलाचेच नव्हे, तर संपूर्ण भारतीय सशस्त्र दलाच्या सन्मानाचे आणि व्यावसायिकतेचे प्रतिनिधित्व करतात. दीर्घकाळ या पदांवर प्रामुख्याने पुरुष अधिकाऱ्यांची नियुक्ती होत होती. मात्र २०२५ मध्ये लेफ्टनंट कमांडर यशस्वी सोलंकी यांच्या नियुक्तीनंतर महिलांसाठी नवे दालन खुले झाले. त्यानंतर मेजर नव्या शेखावत या भारतीय सैन्याच्या पहिल्या महिला अधिकारी म्हणून या प्रतिष्ठित भूमिकेत विराजमान झाल्या आणि महिलांच्या प्रगतीचा हा प्रवास आणखी मजबूत झाला. राष्ट्रपती भवनातील अधिकृत कार्यक्रमांमध्ये राष्ट्रपतींसमवेत उभ्या असलेल्या मेजर शेखावत यांच्या छायाचित्रांनी आणि व्हिडीओंनी देशभरातील तरुणांमध्ये विशेष प्रेरणा निर्माण केली आहे. विशेषतः सैन्यात प्रवेश करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या अनेक तरुणींसाठी त्या 'नारी शक्ती'चे प्रेरणादायी प्रतीक ठरल्यात.

भारतीय सैन्यात महिलांचा प्रवास पाहिला तर १९९० च्या दशकाच्या सुरुवातीला महिलांना शॉर्ट सर्व्हिस कमिशनद्वारे प्रवेश देण्यास सुरुवात झाली. त्यानंतर त्यांच्या जबाबदाऱ्या आणि संधी सातत्याने वाढत गेल्या. २०२० मध्ये सर्वोच्च न्यायालयाने महिला अधिकाऱ्यांना परमनंट कमिशन देण्याचा ऐतिहासिक निर्णय दिल्यानंतर महिलांसाठी नेतृत्व, कमांड आणि दीर्घकालीन सेवाकार्यासाठी नवे मार्ग खुले झाले. मेजर नव्या शेखावत यांची नियुक्ती हा या व्यापक बदलाचा महत्त्वाचा भाग आहे. त्यांचा प्रवास हेही सिद्ध करतो की केवळ लढाऊ शाखाच नव्हे, तर रसद आणि सहाय्यक शाखांतील अधिकारीही गुणवत्ता आणि उत्कृष्ट कामगिरीच्या बळावर सर्वोच्च पदांपर्यंत पोहोचू शकतात.

सैन्यातील यश हे केवळ शैक्षणिक गुणवत्तेवर अवलंबून नसून शारीरिक तंदुरुस्ती, नेतृत्व, आत्मविश्वास, शिस्त आणि चारित्र्य या सर्व गुणांच्या एकत्रित विकासावर आधारित असते. त्यांची नियुक्ती भारतीय सैन्याच्या मूलभूत मूल्यांची कर्तव्य, सन्मान आणि सेवा पुन्हा एकदा प्रचिती देते. गुणवत्ता आणि पात्रतेच्या आधारावर महिलांना उच्च जबाबदाऱ्या देऊन भारतीय सैन्याने नेतृत्व हे लिंगावर नव्हे तर गुणवत्तेवर अवलंबून असते, हा भक्कम संदेश दिला. राष्ट्रपती भवनात आपल्या जबाबदाऱ्या पार पाडताना त्या असंख्य भारतीय युवक-युवतींसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत. त्यांचा प्रवास शिस्त, चिकाटी, व्यावसायिकता आणि निःस्वार्थ सेवाभाव यांचे उत्तम उदाहरण आहे. भारतीय सैन्याची वर्दी परिधान करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या प्रत्येक तरुणासाठी मेजर नव्या शेखावत यांची कथा एक महत्त्वाचा संदेश देते - समर्पण, गुणवत्ता आणि सातत्यपूर्ण मेहनत यांच्या बळावर इतिहास घडवता येतो. जो महिलेच्या यशाचा नाही, तर तिच्या जिद्दीचा, कर्तृत्वाचा आणि नेतृत्वगुणांचा गौरव करणारा आहे.

# उमेदीचा वटवृक्ष : रामकृष्ण गायकवाड उर्फ आपले बाबुराव

ज्यांच्या नावातच 'बाबुराव' ही आपुलकी आहे, असे आमचे रामकृष्ण गायकवाड आज वयाची एक नवी पायरी चढत आहेत. आज त्यांचा वाढदिवस. पण हा वाढदिवस फक्त एका व्यक्तीचा नाही, तर एका संघर्षाच्या, कष्टाच्या आणि समाजसेवेच्या पर्वाचा आहे. शून्यातून विश्व उभे करणारा माणूस बाबुरावांचा प्रवास सोपा नव्हता.

गरीब परिस्थितीत त्यांनी लहानपण घालवले. तेव्हाची घरात परिस्थिती जेमतेम,अंगावर पूर्ण कपडे नाहीत, पण डोक्यात मात्र मोठी स्वप्नं. 'माझ्या कुटुंबाला आणि समाजाला स्वाभिमानाने जगवायचं' ही एकच जिद्द घेऊन, पडले-उठले. मित्रासमवेत हसत जगणं शिकले. त्या काळात पैसा नव्हता, पण प्रामाणिकपणा होता. शब्दाला किंमत होती. हळूहळू त्यांनी उमेदीने मालमत्ता जमवली. आज त्यांच्या नावावर जी काही मालमत्ता आहे ती कुठल्या वारशातून आली नाही, तर घामाच्या एक-एक थेंबातून उभी राहिली आहे. त्यांनी दाखवून दिलं की परिस्थिती माणसाला लहान करु शकते, पण माणूस परिस्थितीला लहान करु शकतो. समाजकार्य म्हणजेच त्यांचा श्वास पैसा आला, पण मनस्थिती बदलली नाही. उलट बाबुराव गावाकडे वळले. लग्न, अंत्यविधी, शाळेची फी, दवाखान्याचा खर्च ज्याला गरज होती त्याच्या दारात बाबुराव आधी हजर. कोणत्याही जाती-धर्माचा भेदभाव त्यांनी कधी केला नाही. गावातील मंदिर, शाळा, स्मशानभूमीसाठी त्यांनी नेहमीच मदतीचा हात पुढे केला.



आपले बाबुराव हे नाव त्यांना लोकांनीच दिले. कारण संकटात ते आपले वाटायचे. कोणाच्याही घरी आनंद असो वा दुःख, बाबुराव तिथे असायचेच. समाजकार्य करताना त्यांनी राजकारणातही हात आजमावला. राजकीय माध्यमातून त्यांनीआपले लोक जमवले, पण ती सत्ता उपभोगण्यासाठी नाही, तर लोकांची कामे करुन घेण्यासाठी. सामान्य माणसाचे काम झटपट व्हावे यासाठी त्यांचा एक फोन पुरेसा होता. आता वय झाले, पण आदर तसाच काळ कोणासाठी थांबत नाही. आज बाबुरावांचे वय झाले आहे. पूर्वीसारखी धावपळ आता जमत नाही. शरीर साथ देत नाही. पण त्यांची नजर आणि मन मात्र आजही गावासाठी तितकेच तळमळते. आज ते घरी बसून जरी असतील, तरी त्यांचा आशीर्वाद आणि सल्ला प्रत्येक कार्यकर्त्याला बळ देतो. आजच्या पिढीला बाबुरावांकडून शिकण्यासारखे खूप काही आहे. कसे जगायचे, कसे कमवायचे आणि कमावलेले कसे वाटायचे हे त्यांनी जगून दाखवले. बाबुराव, तुम्हाला वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा! देव तुम्हाला निरोगी दीर्घायुष्य देवो. तुमच्या हातून आणखी समाजकार्य घडो. तुमची उमेद, तुमचा प्रामाणिकपणा आणि 'सगळ्यांना आपलेसे करण्याची' वृत्ती आम्हा सर्वांसाठी कायम प्रेरणा राहील. आज तुम्ही थकला असाल, पण तुम्ही उभा केलेला वटवृक्ष आम्ही सर्वजण जगवू. तुमचा संघर्ष आम्हाला शिकवण आहे आणि तुमचे कार्य आमच्यासाठी आदर्श आहे.

**वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!**



**शेषराव नर्मदा गोपाळ कडू
वरुड**

# बालपणाचा बदलता चेहरा

एखाद्या समाजाचे भविष्य काय असेल, याचा अंदाज त्या समाजातील मुलांच्या बालपणाकडे पाहून येतो. कारण बालपण ही केवळ आयुष्यातील एक अवस्था नसते; ती व्यक्तिमत्त्व घडविण्याची, मूल्ये रुजविण्याची आणि संस्कारांची पेरणी करण्याची वेळ असते.

बालपण बदलत आहे, हे वास्तव आहे; पण हा बदल विकासाच्या दिशेने आहे की संवेदनांच्या ऱ्हासाकडे याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. गेल्या काही वर्षांत भारतीय कुटुंबव्यवस्थेत मोठे बदल झाले आहेत. आई-वडील दोघेही नोकरी किंवा व्यवसायात व्यस्त आहेत. संयुक्त कुटुंबांची जागा विभक्त कुटुंबांनी घेतली आहे. मुलांसोबत वेळ घालवणारी आजी-आजोबांची पिढी अनेक घरांत उरलेली नाही. परिणामी, मुलांना गुंतवून ठेवण्यासाठी मोबाईल हा सर्वात सहज उपलब्ध पर्याय बनला आहे. डे-केअर, प्ले-स्कूल आणि ॲक्टिव्हिटी क्लासेस यांची चलती वाढत आहे. ही या बदलत्या जीवनशैलीचीच परिणती आहे. या सगळ्यात मुलांच्या हातात आलेला स्मार्टफोन हा केवळ एक साधन राहिलेला नाही; तो त्यांच्या बालविश्वाचा केंद्रबिंदू बनत चालला आहे.



आज अनेक घरांमध्ये सकाळचा दिवस एकाच दृश्याने सुरू होतो. आई-वडील दोघेही कामावर जाण्याच्या तयारीत असतात. मुलाला शाळेत सोडायचे, स्वतः ऑफिसला वेळेत पोहोचणे, वाहतुकीचा ताणतणाव, वेळेची धावपळ या सगळ्यात मुलांना काही वेळ शांत बसवायचे असेल, तर सर्वात सोपा उपाय म्हणजे मोबाईल. मुलगा किंवा मुलगी क्षणात स्क्रीनमध्ये रमतात आणि घरात शांतता पसरते. ही शांतता मात्र वरवरची आहे. कारण त्या शांततेत हळूहळू कोवळ्या पिढीचा संवाद हरवत आहे.

आज दोन-तीन वर्षांचे मूल स्मार्टफोन इतक्या सहजपणे वापरते, की अनेकदा मोठ्यांनाही आश्चर्य वाटते. कोणते कार्टून कुठे आहे, कोणता गेम कसा सुरू करायचा, जाहिरात कशी बंद करायची, पुढचा व्हिडीओ कसा लावायचा, हे त्यांना कोण शिकवत नाही; ते स्वतः शिकतात. आजची मुले अत्यंत बुद्धिमान, जिज्ञासू आणि तंत्रज्ञानाशी मैत्री करणारी आहेत. अलीकडे आठ वर्षांच्या एका मुलाने तब्बल १०६ भाषा शिकल्याची बातमी चर्चेत होती. ही घटना मुलांच्या अफाट ग्रहणक्षमतेचे उदाहरण आहे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

### न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल येथे

# गाईड विभागातर्फे वृक्षारोपण व वृक्षदिंडी उत्साहात संपन्न

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल येथील गाईड विभागाच्या माँ जिजाऊ पथकातर्फे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी वृक्षारोपण व वृक्षदिंडी कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. विद्यार्थिनींनी विविध प्रकारची फळझाडे, औषधी व शोभेची रोपे शाळेत आणून त्यांचे वृक्षारोपण केले. तसेच परिसरात वृक्षदिंडी काढून झाडे लावा, झाडे जगवा हा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक अश्विन पोच्छी होते. प्रमुख अतिथी म्हणून किशोर मांडेकर उपस्थित होते. तसेच ज्येष्ठ शिक्षिका मेघवींनी बडे व सविता ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना वृक्षांचे पर्यावरणीय



महत्त्व, वृक्षारोपणाची आवश्यकता तसेच लावलेल्या झाडांचे नियमित संगोपन करण्याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संवर्धन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. या उपक्रमाचे नियोजन व मार्गदर्शन गाईड कॅप्टन जे.डी.कोल्हे यांनी केले. विद्यार्थिनींच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी मनापासून कौतुक केले.

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| अमरावती | २९ | २४ |
| यवतमाळ | २८ | २१ |
| अकोला | २७ | २४ |
| वाशिम | २८ | २३ |
| बुलढाण | २७ | २२ |
| वर्धा | ३० | २३ |
| नागपूर | २९ | २४ |
| चंद्रपुर | २९ | २५ |

# विपिन बाफना अपहरण-हत्याकांड : दोन्ही आरोपींना फाशीऐवजी जन्मठेप

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – नाशिक जिल्ह्यातील इंजिनिअरिंग विद्यार्थी विपिन बाफना याच्या २०१३ मधील बहुचर्चित अपहरण आणि हत्या प्रकरणातील दोन आरोपींची फाशीची शिक्षा उच्च न्यायालयाने रद्द केली. न्या. भारती डांगरे आणि न्या. मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठाने हा गुन्हा 'दुर्मिळातील दुर्मिळ' या वर्गवारीत मोडत नसल्याचे स्पष्ट केले. याचवेळी आरोपी चेतन पगारे आणि अमन जाट यांची फाशी ३० वर्षांच्या सक्तमजुरीत बदलली. ८ जून २०१३ रोजी विपिन हा अभियांत्रिकीचा विद्यार्थी नृत्याच्या वर्गाला जाण्यासाठी घरातून बाहेर पडला, पण परतला नाही. रात्री ११.३० वाजता त्याच्याकडून कुटुंबीयांना एक फोन आला, त्यात त्याने आपण मित्राच्या घरी रात्री थांबणार असून दुसऱ्या दिवशी सकाळी परतणार असल्याचे सांगितले. दुसऱ्या दिवशी सकाळीही विपिन परत न आल्याने कुटुंबीयांनी चालकाशी संपर्क साधला. तेव्हा डान्स क्लास त्यांना ८ जूनला विपिन क्लासला आलाच नव्हता, असे लक्षात आले. त्यानंतर कुटुंबीयांनी पोलिसांकडे तो बेपत्ता असल्याची तक्रार नोंदवली होती.

# महेश बोरकुटे यांच्या वाढदिवशी विद्यार्थ्यांना दप्तर वाटप व वृक्षारोपण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – वाढदिवस साजरा करण्याचा आदर्श वस्तुपाठ वरुडकरांनी पाहिला. हरी सेवा फाउंडेशनचे सदस्य आणि जायंटस ग्रुप ऑफ वरुडचे कोषाध्यक्ष महेश बोरकुटे यांनी आपला वाढदिवस मोठा खर्च न करता, गरीब विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवून आणि पर्यावरण संवर्धन करुन साजरा केला.

नगर परिषद सावता



विद्यमंदिर शाळेत आयोजित या कार्यक्रमात गरजू विद्यार्थ्यांना शालेय दप्तरांचे वाटप करण्यात आले. यासोबतच सर्व विद्यार्थ्यांना चॉकलेट वाटून आनंद द्विगुणित करण्यात आला. वाढदिवसाच्या निमित्याने शाळा परिसरात वृक्षारोपणही करण्यात आले. वसुंधरेचे रोपण म्हणजेच खरा वाढदिवस हा संदेश यातून देण्यात आला. यावेळी वरुडमधील प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ञ मनोहर आंडे, डॉ.प्रविण ठाकरे, भागवत आंडे, माजी अध्यक्ष नितीन खेरडे, डॉ.आर.बी.खवले, उमेश कांडलकर, हरिहर वरुडकर, जायंटस ग्रुप ऑफ वरुडचे अध्यक्ष विजय गुल्हाने, निकम, शेषराव कडु, कांचन बोरकुटे, कमला बोरकुटे, प्रशांत बोरकुटे, दिक्षा वानखडे, प्रा.किशोर तडस, विजय कडू, विवेक चौधरी, राहुल पांडव, उमेश निस्ताने, लीलाधर सुपले व शाळेतील सर्व कर्मचारी, विद्यार्थी असे अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाला मुख्याध्यापक, शिक्षक, पालक आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या गजरात महेश बोरकुटे यांचे आभार मानले.

# माजी खा.राऊत कुटुंबीयांविरोधात गुन्हा : सुनेकडून प्रतिबंधक कायद्यांतर्गत गंभीर आरोप

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे ज्येष्ठ नेते व माजी खासदार विनायक राऊत, त्यांचा पुत्र तथा माजी नगरसेवक गितेश राऊत आणि कुटुंबातील इतर सदस्यांविरोधात ठाण्यातील कापुरबावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गितेश राऊत यांच्या पत्नी गिरिजा राऊत यांच्या तक्रारीवरून कौटुंबिक छळासह महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष, अनिष्ट आणि अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक कायद्यांतर्गत विविध कलमांनुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पत्रकार परिषदेत गिरिजा राऊत यांनी सात वर्षांच्या वैवाहिक आयुष्यात शारीरिक, मानसिक, भावनिक व आर्थिक छळ झाल्याचा आरोप केला. उपचाराच्या नावाखाली २०१८ ते २०२२ या कालावधीत कथित अघोरी विधी करण्यास भाग पाडण्यात आले.



**वरुड :** वरुड पोलीस स्टेशनचे नवनियुक्त ठाणेदार अशोक जाधव यांचा सत्कार करताना डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोलाचे कार्यकारी परीक्षद सदस्य मोरेश्वर वानखडे, माजी नप उपाध्यक्ष हरीश कानुगो, नगरसेवक योगेश्वर खासबागे, मुरलीधर पवार, राजेंद्र टेकाडे.

# देवकुंड धबधब्यात दोन जण बुडाले

### पुण्याहून रायगड फिरण्यासाठी आले होते १७ पर्यटक, बचाव कार्य सुरू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



***अलिबाग*** – रायगड जिल्ह्यात धक्कादायक घटना घडली असून माणगावच्या देवकुंड धबधब्यात दोन पर्यटक बुडाल्याची घटना घडली आहे. पुण्याहून १७ जणांचा ग्रुप फिरायला आला होता. धबधब्याखाली आनंद घेत असताना दोघे बुडून बेपत्ता झाले. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. बचाव पथकांना पाचारण केले आहे. दरम्यान, ही घटना नेमकी घडली कशी? याबाबतची माहिती अद्याप मिळालेली नाही.

दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, देवकुंड धबधब्यासह माणगावमधील वर्षा पर्यटन स्थळांवरनिर्बंध असताना देखील पर्यटकांची हुल्लडबाजी सुरु आहे. या परिसरात पोलिस बंदोबस्त तैनात असतानाही पर्यटक धबधब्यावर पोहोचले कसे? असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.

नवापूरमध्ये नदीत बुडून दोन मुलांचा मृत्यू नंदुरबार जिल्ह्यात नवापूरमध्ये नदीत बुडून दोन अल्पवयीन मुलांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. आठवडा बाजार परिसरातील रंगवाली नदीच्या शेंड्या डुब येथे ही घटना घडली आहे. आंघोळीसाठी गेलेल्या तिघांपैकी दोघांचा मृत्यू झाला आहे, तर एकावर उपचार सुरू आहेत.

# संत ज्ञानेश्वर माऊली पालखी सोहळ्यासाठी फलटण सज्ज

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**कराड** – संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे १७ जुलै रोजी फलटण येथे आगमन होणार असल्याच्या पार्श्वभूमीवर फलटण नगरपरिषद वारकरी व भाविकांच्या स्वागतासाठी सज्ज झाली आहे.

पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या दिंडीकरी, वारकरी आणि भाविकांना सर्वतोपरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य,

### वीज व पालखी तळावरील सुविधांची जय्यत तयारी



वीज आणि पालखी तळावरील व्यवस्थेची व्यापक तयारी करण्यात आली आहे.

नगरपरिषदेचे मुख्याधिकारी निखिल जाधव यांनी सांगितले की, जिंती नाका ते विमानतळ मैदान या पालखी मार्गावरील अतिक्रमणे हटविण्यात आली असून संपूर्ण मार्गाची स्वच्छता आणि आकर्षक एलईडी पथदिव्यांची उभारणी अंतिम टप्प्यात आहे. तसेच महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र तात्पुरती स्वच्छतागृहे उभारण्याचे कामही सुरू आहे.

महावितरणकडून वीज वाहिन्यांची देखभाल, झाडांची छाटणी, ट्रान्सफॉर्मर आणि वीज खांबांची सुरक्षा तसेच अखंडित वीजपुरवठ्यासाठी स्वतंत्र जनरेटर, विद्युत टॉवर आणि सॅटेलाइट पॉइंटची उभारणी सुरू आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पालखी मार्गावरील रस्त्यांची दुरुस्ती व काँक्रीटीकरण अंतिम टप्प्यात असून वाहतूक सुरळीत राहण्यासाठी पोलिसांकडून स्वतंत्र वाहतूक आराखडा तयार करण्यात येत आहे.

### जे.जे.खेरडे प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेचा विद्यार्थी

# प्रथमेश कदम शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्थानिक नवयुवक शिक्षण संस्था वरुड द्वारा संचालित जे.जे.खेरडे प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे द्वारा आयोजित पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत प्रथमेश चत्रभुज कदम याने घवघवीत यश संपादन केले असून शिष्यवृत्तीस पात्र ठरला आहे.

त्याच्या या यशाने पुन्हा शाळेच्या शिरपेच्यात मानाचा तुरा रोवला गेला आहे. प्रथमेशच्या यशाबद्दल सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे. त्याने आपल्या यशाचे श्रेय त्याचे आई–वडील व मार्गदर्शक शिक्षकांना दिले.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थाध्यक्ष संजय गणोरकर, उपाध्यक्ष पुरुषोत्तम कळमकर, सचिव जगदीश नेरकर, सहसचिव शामसुंदर खेरडे व सर्व संचालक मंडळ तसेच मुख्याध्यापक भूपेंद्र पोहरकर सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सुद्धा प्रथमेशचे कौतुक व अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल येथे

# इको क्लबच्या माध्यमातून हरित भविष्यासाठी वृक्षारोपण संकल्प

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – श्री.शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचलित न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल वरुड येथे आज इको क्लब च्या वतीने वृक्षारोपणाचा अतिशय स्तुत्य असा पर्यावरण पूरक कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमांमध्ये एक वर्ग एक झाड या संकल्पनेनुसार प्रत्येक वर्गाने एक झाड लावून त्या झाडाचे संगोपन करण्याचा संकल्प केला. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी आज शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी वृक्ष लागवड केली व सर्व विद्यार्थ्यांनी एक झाड, हजारो श्वास, झाडे



लावूया, भविष्य घडवूया, एकच ध्यास हिरवा श्वास, असे नारे देत वृक्षदिंडी देखील वर्ग ५ ते १० च्या विद्यार्थ्यांची घेण्यात आली. या कार्यक्रमांमध्ये सर्व विद्यार्थ्यांनी वृक्षारोपणा सोबत काही संदेश देणारे पोस्टर्स देखील तयार करून आणले व झाडे लावा, झाडे जगवा, पर्यावरण वाचवा, भविष्य घडवा, असा संदेश विद्यार्थ्यांमार्फत देण्यात आला.

या कार्यक्रमाला उपस्थित ज्येष्ठ शिक्षक मांडेकर यांनी विद्यार्थ्यांना वृक्ष आपले कसे चांगले मित्र आहेत व त्यांचा औषधीय उपयोग समजून सांगण्यात आला तसेच ज्येष्ठ शिक्षिका मेघवींनी बढे, सविता ठाकरे यांनी वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे या या संत तुकारामांच्या प्रसिद्ध अभंगाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमांमध्ये सर्व वर्ग शिक्षकांनी आपल्या वर्गाच्या नावाने एक वृक्ष लागवड केली तसेच गाईड्स विद्यार्थिनींनी कोल्हे यांच्या मार्गदर्शनात अतिशय उत्स्फूर्तपणे वृक्षदिंडी व वृक्षांची लागवड केली.

या कार्यक्रमाचे संचालन व आभार विज्ञान शिक्षिका शुभांगिनी हेडाऊ यांनी केले व सोबतच वृक्षारोपण व वृक्षांचे संगोपन महत्त्व इको क्लबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सांगितले. हा कार्यक्रम मुख्याध्यापक अश्विन पोच्छी शिक्षक, शिक्षिका, व कर्मचारीयांच्या मार्गदर्शनात घेण्यात आला.

# ‘फडणवीसांचा अडीच वर्षाचा कार्यकाळ पूर्ण होतोय, आता मुख्यमंत्रीपद राष्ट्रवादीला द्या’: महायुतीकडे राष्ट्रवादीच्या नेत्याची मोठी मागणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – राज्यात सध्या मुख्यमंत्रीपदाबाबत अचानक चर्चांना उधाण आले आहे. शिवसेना ठाकरे पक्षाकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दिल्लीत जाणार असल्याचा दावा वारंवार केला जात आहे. खासदार संजय राऊत यांनी ‘देवेंद्र फडणवीस यांच्यानंतर राज्यात चंद्रशेखर बावनकुळे हे मुख्यमंत्री होतील, गिरीश महाजन हे मुख्यमंत्री होऊ शकणार नाहीत,‘ असे वक्तव्य केले होते. तर दुसरीकडे, आमदार बच्चू कडू यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेच पुन्हा राज्याची धुरा सांभाळतील, असा विश्वास व्यक्त केला होता. यात ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांनीही उडी घेतली. गिरीश महाजन हे देखील मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत असल्याचा दावा खडसे यांनी केला.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**श्री.म.दा.सैंदाणे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४५९/२०२६ ने.ता.२१/०७/२०२६**

**अर्जदार :-**

इंदिरा अंबादास म्हस्की उर्फ मस्की
वय अं.७० वर्ष, धंदा-शेती
रा.सावंगी, ता.वरुड,जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे अंबादास मारोतराव उर्फ मारोती म्हस्की, रा.सावंगी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२१/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख ०२/०७/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय**

**क्र.प्रस्तु-१/कावी १८३/२०२६ दि.०५/०५/२०२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **मोहम्मद रियाज शेख गुलाम रसूल, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **नगर परिषद वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वतः नामे-मोहम्मद रियाज शेख गुलाम रसूल, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.१३/०३/१९८३** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ अ‍ॅक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी ०५/०५/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय**

**क्र.प्रस्तु-१/कावी २३५/२०२६ दि.२६/०५/२०२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **शहनाज बी शेख लुकमान, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **नगर परिषद वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वतः नामे-शहनाज बी शेख लुकमान, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.०४/०३/१९६९** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ अ‍ॅक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायलयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी २६/०५/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.आय.जे.ठाकरे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५७५/२०२६ ने.ता.१४/०८/२०२६**

**अर्जदार :-**

धिरज नारायणराव नेवारे
वय अं.४९ वर्ष, धंदा-मजुरी
रा.घुईखेड, ता.चांदुर रेल्वे, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत लताबाई नारायणराव नेवारे, रा.नंदुराबाद, पो.सुलतानपुर, ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१४/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख १०/०७/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# पहलगाममध्ये ढगफुटीने थरकाप, शेती, रस्ते वाहून गेले, उत्तराखंडमध्ये जलविद्युत प्रकल्पाजवळ भूस्खलन : देशाच्या सुमारे ७० टक्के भागातून मान्सूनचे ढग गायब

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**पहलगाम** – जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे शनिवारी रात्री ढगफुटीमुळे पूर आला. अनेक शेतांचे नुकसान झाले आणि रस्ते वाहून गेले. उत्तराखंडमधील विकासनगर येथे मुसळधार पावसामुळे लखवार जलविद्युत प्रकल्पाजवळ भूस्खलन झाले, ज्यात अनेक वाहने आणि यंत्रसामग्री गाडली गेली. देशाच्या सुमारे ७० टक्के भागातून मान्सूनचे ढग नाहीसे झाले आहेत. पुढील पाच दिवसांत राजस्थान, दिल्ली-एनसीआर, पश्चिम मध्य प्रदेश, गुजरात आणि महाराष्ट्रातही पावसाची शक्यता कमी आहे. मान्सूनला सक्रिय ठेवणारी प्रणाली कमकुवत पावसाला विराम मिळाल्याने मध्य प्रदेश, दिल्ली आणि पश्चिम उत्तर प्रदेशसह उत्तर भारतातील राज्यांमध्ये तापमान वाढले आहे. राजस्थानमधील श्रीगंगानगर येथे ४२ तापमानाची नोंद झाली. पॅसिफिक महासागरात तीन हवामान प्रणाली तयार होत आहेत. जर या बंगालच्या उपसागरात पोहोचल्या, तर १८ ते २५ जुलै दरम्यान पावसाची दुसरी फेरी सुरू होऊ शकते. मान्सूनला सक्रिय ठेवणारी प्रणाली कमकुवत झाली आहे. हवामान विभागाच्या मते, देशाच्या ७० टक्के भागातून मान्सूनचे ढग नाहीसे होण्यामागे सर्वात मोठे कारण म्हणजे मान्सूनला सक्रिय ठेवणारी प्रणाली कमकुवत होणे हे आहे. ९ जुलैनंतर बंगालच्या उपसागरात कोणतीही नवीन मजबूत कमी दाबाची प्रणाली तयार झाली नाही, ज्यामुळे मान्सूनच्या वाऱ्यांना पुरेशी आर्द्रता मिळू शकली नाही.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.आय.जे.ठाकरे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५७८/२०२६ ने.ता.१४/०८/२०२६**

**अर्जदार :-**

सौ.मनिषा परसराव बिसांद्रे
वय अं.५० वर्ष, धंदा-गृहीणी
रा.वार्ड क्रं.१, सुयोग कॉलनी, कारंजा, ता.कारंजा, जि.वर्धा

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत लिला मुकुंदराव ढवळे, रा.नाचनगांव, ता.देवळी, जि.वर्धा** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१४/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख १०/०७/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**एम.डी.सैंदाण साहेब, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५६५/२०२६ ने.ता.१९/०८/२०२६**

**अर्जदार :-**

१) नामदेव उकंडराव झोडे, वय अं.५६ वर्ष, धंदा-शेती
२) रघुनाथ उकंडराव झोडे, वय अं.५२ वर्ष, धंदा-शेती
क्र.१ व २ रा.वाठोडा, ता.वरुड, जि.अमरावती
३) जिजा अशोकराव घोरपडे, वय अं.५० वर्ष, धंदा-घरकाम
रा.आलोडा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत उकंडराव गणपतराव झोडे व मयत जयवंताबाई उकंडराव झोडे, रा.वाठोडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१९/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख ०९/०७/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.एम.डी.सैंदाणे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५७७/२०२६ ने.ता.१४/०८/२०२६**

**अर्जदार :-**

प्रविण कृष्णराव कुसळे
वय अं.५३ वर्ष, धंदा-मजुरी
रा.वाठोडा, ता.वरुड,जि.अमरावती
ह.मु.नर्मदा को.ऑप.सोसायटी जवळ, काटोल रोड, नागपुर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत यमुनाबाई कृष्णराव कुसळे, रा.वाठोडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१४/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख १०/०७/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय**

**क्र.प्रस्तु-१/कावी /२०२६ दि.०८/०७/२०२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **आरीफ खान वाहाब खान, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **नगर परिषद वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **बहिण नामे-शबिना परवीन वाहाब खान, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.१५/०६/१९८२** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ अ‍ॅक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी ०८/०७/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

### रुग्णांच्या जीवाशी खेळ? वरुडच्या कोट्यवधींच्या शासकीय रुग्णालयाच्या

# बांधकामात ठेकेदाराची मनमानी : प्रशासनावर दुर्लक्षाचे आरोप

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**वरुड** – शासकीय रुग्णालयाचे बांधकाम हा थेट जनतेच्या आरोग्याशी आणि जीविताशी निगडित असलेला अत्यंत संवेदनशील विषय आहे. राज्य शासनाकडून कोट्यावधी रुपयांचा निधी खर्च करुन उभारण्यात येणाऱ्या या रुग्णालयांच्या दर्जेदार बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि राष्ट्रीय आरोग्य अभियान यांच्याकडून कडक नियमावली आणि निकष घालून दिले जातात. कंत्राटदाराने या कामात कोणतीही तडजोड न करता कशा प्रकारे काम केले पाहिजे आणि कोणत्या नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे, याचा सविस्तर आढावा घेतला असता शहरातील शासकीय रुग्णालयाच्या बांधकामात अनेक अनियमितत्ता दिसुन येत असतांना शासन व प्रशासन कुंभकर्णी झोपेत असल्याने ठेकेदार मनमानी स्वरुपाचे बांधकाम करीत आहे. जे येत्या काळात रुग्णांसह आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या जिवावर बेतण्याची शक्यता नाकारता येत नाही.

प्राप्त माहितीनुसार, शासकीय रुग्णालयाचे बांधकाम हे सामान्य इमारती सारखे नसते. यासाठी भारतीय सार्वजनिक आरोग्य मानके आणी राष्ट्रीय इमारत संहिताचे नियम पाळणे अनिवार्य आहे. १) रुग्णालयाच्या प्रत्येक वॉर्डमध्ये नैसर्गिक प्रकाश आणि खेळती हवा असणे आवश्यक आहे. आयसीयू, ऑपरेशन थिएटर आणि जनरल वॉर्ड यांची रचना अशी असावी, ज्यामुळे संसर्ग पसरणार नाही. २) बांधकामाचा दर्जा आणि साहित्याची गुणवत्ता कोट्यावधींच्या कामात साहित्याच्या दर्जाबाबत सर्वाधिक तक्रारी येतात. यासाठी बांधकामाच्या प्रत्येक टप्प्यावर उदा. पाया भरणे, स्लॅब टाकणे नामांकित शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये किंवा मान्यताप्राप्त संस्थेकडून थर्ड पार्टी ऑडिट करुन घेणे बंधनकारक आहे. सिमेंट, स्टील (लोखंड), वाळू आणि विटा वापरण्यापूर्वी त्यांचे शासकीय प्रयोगशाळेत स्ट्रेन्थ टेस्टिंग करणे आणि त्याचे रिपोर्ट सादर करणे आवश्यक आहे. रुग्णालयाला आग प्रतिबंधक साहित्य वापरणे, प्रत्येक मजल्यावर फायर हायड्रंट्स, स्प्रिंकलर्स आणीबाणीच्या प्रसंगी बाहेर पडण्यासाठी सुरक्षित मार्ग देणे अनिवार्य आहे. ३) रुग्णालय उभारताना केवळ भिंती उभारणे पुरेसे नसते, तर खालील तांत्रिक बाबींचे काटेकोर पालन करावे लागते प्रत्येक बेडपर्यंत ऑक्सिजन पोहोचेल अशी गळती विरहित पाईपलाईन सिस्टीम उभारणे. ऑपरेशन थिएटर आणि आयसीयूमध्ये बॅक्टेरिया फ्री विनाइल फ्लोअरिंग आणि भिंतींवर विशेष अँटी-बॅक्टेरियल पेंट वापरणे आवश्यक आहे. अखंडित वीज पुरवठ्यासाठी हाय-कॅपॅसिटी जनरेटर सेट बसवणे, तसेच रुग्णालयातील दूषित पाण्याचा पुनर्वापर करण्यासाठी इफ्लुएंट ट्रीटमेंट प्लांट आणि एसटीपी उभारणे कायदेशीररित्या बंधनकारक आहे. ४) वेळेचे बंधन आणि कामगारांची सुरक्षा दिलेल्या कालमर्यादितच काम पूर्ण करावे लागते. विनाकारण उशीर झाल्यास ठेकेदाराला प्रतिदिन मोठ्या रकमेचा दंड ठोठावला जाऊ शकतो. बांधकाम साईटवर काम करणाऱ्या सर्व मजुरांना हेल्मेट, सेफ्टी शूज, सेफ्टी बेल्ट देणे आणि सर्वांचा विमा उतरवणे ठेकेदाराची जबाबदारी आहे. शासकीय निधी हा जनतेच्या घामाचा पैसा आहे. रुग्णालयाच्या बांधकामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्यास किंवा नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्यात येईल, त्याचे डिपॉझिट जप्त केले जाईल आणि फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल अश्या स्पष्ट सुचना केलेल्या असतात. आणी नियम पाळले नाहीत किंवा ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे काम केले, तर डिफफेक्ट लायबिलिटी पिरियड सामान्यत ३ ते ५ वर्षे अंतर्गत इमारतीची दुरुस्ती ठेकेदाराला स्वतःच्या खर्चाने करावी लागते. तसेच गंभीर त्रुटी आढळल्यास कंत्राट रद्द करुन कंत्राटदाराची मालमत्ता जप्त करण्याचीही तरतूद कायद्यात आहे. त्यामुळे, कोट्यावधींचे कंत्राट घेणाऱ्या ठेकेदाराने केवळ नफ्याचा विचार न करता, रुग्ण आणि डॉक्टरांच्या सुरक्षेचा विचार करुन अत्यंत पारदर्शक आणि दर्जेदार पद्धतीने बांधकाम करणे हेच त्यांचे कायदेशीर आणि नैतिक कर्तव्य आहे. मात्र वरुड शहरात सुरु असलेल्या शासकीय रुग्णालयाच्या बांधकामात दिसुन येत नाही. अनेक तृटी व काही ठीकाणी बांधकामाचा निकृष्ठ दर्जा दिसुन येत असतांना सुद्धा शासन व प्रशासन कुंभकर्णी झोपेत असल्याने या रुग्णालय बांधकमात ठेकेदाराची मनमानी दिसुन येत आहे. जे येत्या काळात रुग्णांसह आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या जिवावर बेतण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## आषाढी वारीसाठी ५,५०० विशेष बसेस सोडणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – आषाढी यात्रेनिमित्त विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक पंढरपुरात येतात. राज्याच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या भाविकांचा प्रवास सुरक्षित व सुखकर व्हावा, यासाठी राज्य परिवहन महामंडळाकडून वारीकाळात ५ हजार ५०० विशेष बस सोडण्याचे नियोजन केले आहे. ग्रुप बुकिंग असल्यास राज्याच्या कोणत्याही गावातून थेट पंढरपूरपर्यंत बस उपलब्ध होईल.

## ब्रह्मपुत्रेवरील मेगा-धरणाच्या सुरक्षेची चीनी भूगर्भशास्त्रज्ञांना चिंता

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**बीजिंग** – तिबेटमधील ब्रह्मपुत्रा नदीवरील जगातील सर्वात मोठ्या जलविद्युत प्रकल्पाच्या खाली असलेल्या एका सक्रिय भूकंपप्रवण रेषेमुळे त्याच्या संरचनेच्या स्थिरतेवर परिणाम होऊ शकतो, असे चिनी भूगर्भशास्त्रज्ञांच्या एका अभ्यासात समोर आले आहे. यामुळे या प्रदेशातील आपत्ती रोखण्यासाठी हे धरण मदत करेल, या चीन सरकारच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

वैज्ञानिकांनी सांगितले की, पूर्व हिमालयीन प्रदेशात पृथ्वीच्या कवचाला पडलेल्या भेगेमुळे या अवाढव्य जलविद्युत प्रकल्पाच्या पायाभूत सुविधांच्या रचनात्मक अखंडतेवर लक्षणीय परिणाम होऊ शकतो.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या नावावर नवा विक्रम

*** महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळाबाबत शरद पवार यांनाही टाकले मागे**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – महाराष्ट्राच्या राजकारणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या नावावर पुन्हा एक नवा विक्रम नोंदविण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहिलेल्या नेत्यांमध्ये देवेंद्र फडणवीस आता तिसऱ्या क्रमांकावर आले आहे. तर मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळाबाबत देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवारांना (डहरीरव झुरुरी) देखील मागे टाकले आहे. १२ जुलै २०२६ पर्यंत देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्रीपदाचा एकूण कार्यकाळ २४३० दिवस (सुमारे ६ वर्षे ७ महिने) इतका झाला असून, त्यांनी शरद पवार (२, ४१२ दिवस) यांना मागे टाकत महाराष्ट्राच्या इतिहासात सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहिलेल्या नेत्यांच्या यादीत तिसरे स्थान पटकावले आहे. त्यांचा कार्यकाळ अद्याप सुरू असल्याने हा विक्रम दररोज वाढत आहे. विशेष म्हणजे शरद पवार चार वेळा मुख्यमंत्री झाले, मात्र त्यांना एकदाही पूर्ण पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करता आला नाही.

## गारपीटग्रस्त फळबागांना तातडीने नुकसानभरपाई द्या

**माजी आमदार देवेंद्र भुयार यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना साकडे**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – तालुक्यात ३० व ३१ मे २०२६ रोजी झालेल्या अवकाळी वादळी वारा व गारपिटीमुळे संत्रा, मोसंबी, केळी, पपईसह विविध फळिपकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई मंजूर करण्यात यावी, अशी मागणी माजी आमदार देवेंद्र महादेवराव भुयार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, वरुड-मोर्शी मतदारसंघातील हजारो शेतकरी अनेक वर्षांपासून संत्रा, मोसंबी, केळी, पपई आणि इतर फळिपकांची लागवड करीत आहेत. मात्र ३० व ३१ मे रोजी झालेल्या अवकाळी वादळी वारा व गारपिटीमुळे हजारो हेक्टरवरील फळबागांचे मोठे नुकसान झाले. या नुकसानीनंतर तहसीलदार, गटविकास अधिकारी व कृषी अधिकारी यांनी संयुक्त पाहणी करून १५ जून २०२६ रोजी शासनाला अहवाल सादर केला आहे. या अहवालानुसार वरुड तालुक्यातील २४ हजार ७७३ शेतकरी बाधित झाले असून २८ हजार ४४५ हेक्टर क्षेत्रा-वरील फळिपकांचे नुकसान झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या अहवालाच्या आधारे शासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत व नुकसानभरपाई मंजूर करावी, अशी विनंती देवेंद्र भुयार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. निवेदनासोबत क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या अहवालाची प्रतही जोडण्यात आली आहे.







